जनमानसाचा निडर आवाज...
# पुणे प्राईम न्यूज
मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure, Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER

दैनिक | वर्ष १ | अंक २१२ | बुधवार, २५ फेब्रुवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210

संक्षिप्त




## डिजिटल अरेस्ट ही निव्वळ फसवणूक; मुख्यमंत्र्यांचे आवाहन

**मुंबई, ता. २४ :** राज्यात वाढत्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत डिजिटल अरेस्ट ही संकल्पनाच बेकायदेशीर असल्याचे स्पष्ट केले. कायद्यात अशा कोणत्याही अटकेची तरतूद नसून, पोलीस किंवा तपास यंत्रणा व्हिडिओ कॉलद्वारे कधीही कोणाला अटक करत नाहीत. अशा प्रकारचे कॉल १०० टक्के फसवणूक असल्याचे सांगत त्यांनी नागरिकांना सावध राहण्याचे आवाहन केले. फसवणूक झाल्यास तातडीने १९३० या क्रमांकावर संपर्क साधण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. पहिल्या एक तासातील (गोल्डन अवर) तक्रार गेलेले पैसे परत मिळवून देण्यास मदत करू शकते. या गुन्ह्यांची सूत्रे परदेशातून हलविली जात असून, नागरिकांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता सायबर पोलिसांशी संपर्क साधावा, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

# पूर्व हवेलीतील मंगल कार्यालये चोरट्यांच्या रडारवर?

## लाखो रुपये घेऊनही सुरक्षा शून्य; पोलिसांचे अपयश उघड

**लोणी काळभोर, ता. २४ :** पूर्व हवेली परिसरातील अनेक मंगल कार्यालयांमध्ये वारंवार होणाऱ्या चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. लग्नसमारंभांसाठी ग्राहकांकडून लाखो रुपये आकारले जात असतानाही मूलभूत सुरक्षेच्या सुविधा उपलब्ध नसल्याचे धक्कादायक वास्तव समोर येत आहे. अनेक ठिकाणी साधे सीसीटीव्ही कॅमेरेही नसल्याने चोरट्यांसाठी ही मंगल कार्यालये अक्षरशः मोकळे मैदान बनल्याची चर्चा परिसरात रंगली आहे.




मागील काही काळात लग्नसमारंभ, साखरपुडा, वाढदिवस किंवा इतर कार्यक्रमांच्या वेळी चोरीच्या घटना वारंवार घडल्याची माहिती समोर येत आहे. कार्यक्रमासाठी आलेल्या नागरिकांच्या दागिन्यांवर, मोबाईलवर तसेच रोख रकमांवर चोरट्यांचा डोळा असल्याचे अनेक घटनांतून स्पष्ट झाले आहे. काही ठिकाणी महिलांच्या पर्स, तर काही ठिकाणी मौल्यवान वस्तू क्षणार्धात लंपास झाल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. मात्र या घटनांनंतरही परिस्थितीत कोणताही बदल झालेला दिसत नाही.

धक्कादायक बाब म्हणजे, अनेक मंगल कार्यालयांमध्ये अद्यापही सीसीटीव्ही कॅमेरे नाहीत. काही ठिकाणी कॅमेरे बसवले असले तरी ते बंद अवस्थेत असल्याचे सांगितले जाते. सुरक्षा रक्षकांची कोणतीही व्यवस्था नाही, पार्किंग व्यवस्थापन नाही, पाहुण्यांच्या सुरक्षेसाठी कोणतेही नियोजन नाही. अशा अनेक त्रुटी उघड होत आहेत. मात्र याकडे कार्यालय चालकांचे पूर्णपणे दुर्लक्ष असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

बुकिंगच्या वेळी मात्र मोठमोठ्या जाहिराती करून आणि आकर्षक सुविधा दाखवून लाखो रुपये आकारले जातात. परंतु प्रत्यक्ष कार्यक्रमाच्या वेळी मूलभूत सुविधांचा देखील अभाव असतो. सुरक्षा हा तर पूर्णपणे दुर्लक्षित विषय झाला आहे. त्यामुळे ग्राहकांचा पैसा अक्षरशः पाण्यात जात आहे.या सर्व प्रकारात पोलिस प्रशासनाची भूमिका काही संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. वारंवार चोरीच्या घटना घडत असतानाही अद्याप एकाही प्रकरणाचा ठोस तपास लागलेला नाही. चोरटे कोण, ते कसे येतात, त्यांचे जाळे काय आहे, याबाबत कोणतीही स्पष्ट माहिती समोर आलेली नाही. त्यामुळे लोणी काळभोर पोलिसांच्या कार्यक्षमतेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मंगल कार्यालयांमध्ये मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असल्यामुळे चोरट्यांसाठी हे सोपे लक्ष्य ठरत आहे. बाहेरून येणाऱ्या संशयित व्यक्तींवर कोणीही नजर ठेवत नाही. कार्यक्रम संपल्यानंतर चोरी झाल्याचे लक्षात येते आणि तोपर्यंत चोरटे पसार झालेले असतात. त्यामुळे पोलिस तपासही अनेकदा निष्फळ ठरत असल्याचे दिसून येते. त्यामुळे मंगल कार्यालय मालकांवर कठोर नियम लागू करावेत, सीसीटीव्ही कॅमेरे सक्तीचे करावेत, सुरक्षा रक्षक ठेवणे बंधनकारक करावे आणि वारंवार चोरी होणाऱ्या ठिकाणांवर पोलिसांनी विशेष लक्ष ठेवावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

दरम्यान, इतक्या घटना घडूनही पोलिस प्रशासनाकडून ठोस आणि परिणामकारक कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढत आहे. लग्नासारख्या आनंदाच्या प्रसंगी चोरीची भीती मनात ठेवून कार्यक्रम करावा लागणे ही दुर्दैवी बाब असल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे. आता पूर्व हवेलीतील मंगल कार्यालयांवर पोलिस प्रशासन कडक कारवाई करणार का, सुरक्षा नियमांची अंमलबजावणी होणार का, की हा विषय नेहमीप्रमाणे दुर्लक्षित राहणार, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे. नागरिक मात्र ठोस निर्णयाची वाट पाहत आहेत.

### लग्नसमारंभ चोरट्यांच्या रडारवर!

कुंजीरवाडी (ता. हवेली) येथील कुंजीरलॉन्स या मंगल कार्यालयात ८ नोव्हेंबर २०२५ ला पार पडलेल्या विवाह सोहळ्यात नमीता सुभाष मोरे (वय ५४, रा. हडपसर, पुणे) यांचे सुनेसाठी ठेवलेले सुमारे ७ लाख ५० हजार रुपयांचे स्त्रीधन चोरट्यांनी लंपास केले. त्यानंतर धनश्री लॉन्स येथे झालेल्या कार्यक्रमात सुभाष किसन हगवणे (वय ६५, नायगाव) आणि बाळासाहेब सुदाम पवार यांच्या गळ्यातील सुमारे अडीच तोळ्यांच्या सोन्याच्या साखळ्या १६ नोव्हेंबरला चोरून नेण्यात आल्या. थेऊर येथील वृंदावन पॅलेस मंगल कार्यालयात अच्युत भालचंद्र भगत यांच्या सुनेसाठी ठेवलेले दागिने व रोख रक्कम असा जवळपास १४ लाख रुपयांचा ऐवज चोरट्यांनी लंपास केला. तसेच धनश्री लॉन्समधील विवाह सोहळ्यात चोरट्यांनी सेवानिवृत्त पोलिस मारुती बाबुराव काळे (वय ७१, रुपीनगर, बेकराईनगर, पुणे) यांच्या गळ्यातील अडीज तोळ्याची सोनसकळी २० फेब्रुवारीला चोरून नेली आहे. त्यामुळे लग्नसमारंभ चोरट्यांच्या रडारवर आल्याचे दिसून येत आहे.

## बदलापुरातील स्त्री बीज विक्रीचं राज्याबाहेर कनेक्शन

**बदलापुर, ता. २४ :** बदलापुरात स्त्री बीज बेकायदेशीर विक्री प्रकारणाचे कनेक्शन हे राज्याबाहेर असल्याचे तपासात समोर आले आहे. सुलक्षणा गाडेकर, अश्विनी चाबुकस्वार, मंजुषा वानखेडे यांना या प्रकरणात अटक करण्यात आलंय. यांच्या पोलीस कोठडीदरम्यान पोलिसांकडून तिघींची कसून चौकशी करून त्यांचा कोणत्या डॉक्टर, हॉस्पिटल आणि खतऋ सेंटरसोबत कनेक्शन आहे हे समोर येणार आहे. शिवाय या टोळीने महिलांचे बनावट आधार कार्ड तयार करून एकाच महिलाचं वेगवेगळ नाव वापरून तिला अनेकदा डोनर बनवलं आहे.

दरम्यान, या आरोपींनी आपल्या इतर टोळीच्या सदस्यांच्या मदतीने महिलांचे बनावट सत्यप्रतिज्ञा पत्र, आधार कार्ड, इतर बनावट कागदपत्रे तयार केल्याचेही समोर आले आहे. तर आरोपींच्या मोबाईलमध्ये अनेक महिलांचे फोटो, महिलांचे खोटे आधारकार्ड तयार करून डोनर बनवत असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. सध्या पोलीस या प्रकरणाची अधिक चौकशी करत असून या प्रकरणाची व्याप्ती वाढण्याची शक्यता आहे.

# पुणे जिल्हा प्रशासनाकडून सात-बारा उताऱ्यातील चुकांबाबत मंडल अधिकाऱ्यांवर कारवाईचा बडगा

**पुणे, ता. २४ :** सात-बारा उताऱ्यामध्ये फेरफाराची नोंद करताना होणाऱ्या चुकांची दखल जिल्हा प्रशासनाकडून घेण्यात आली आहे. चुका करणाऱ्या मंडल अधिकाऱ्यांसह ग्राम महसूल अधिकाऱ्यांवर यापुढे शिस्तभंगाची कारवाई करण्याचा आदेश जिल्हा प्रशासनाने दिला आहे. तसेच, तहसीलदार, प्रांताधिकाऱ्यांनी वेळोवेळी दफ्तर तपासणी करावी, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.




महाराष्ट्र जमीन महसूल कायद्याच्या कलम १५५ चा वापर सात-बाऱ्यात अनवधानाने झालेल्या चुका दुरुस्तीसाठी करण्यात येतो. त्यानुसार दुरुस्ती करण्यात येते. मात्र, मालकी अथवा इतर हक्कामधील बदलासाठी या कलमाचा वापर करता येत नाही. कलम १५५ चा वापर करून मालकी हक्क, कब्जे, क्षेत्र धारणाप्रकार आणि इतर नोंदी बदलण्यासाठी होत असल्याचे जिल्हा प्रशासनाच्या निदर्शनास आले होते.

दुय्यम निबंधक कार्यालयात झालेल्या दस्तनोंदणीनंतर ई-फेरफारात थेट नोंदी दाखल होतात. त्या फेरफाराची नोंद सात-बारावर घेताना हेतूपुरस्सरपणे नोंदीतील मजकुरात अंशतः चूक केली जाते. त्यामुळे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील कलम १५५ नुसार, अशी प्रकरणे न्यायप्रविष्ट ठरतात. त्यामुळे सातबारा उताऱ्यामध्ये फेरफाराची नोंद करताना चुका करणाऱ्या संबंधित ग्राममहसूल अधिकारी किंवा मंडल अधिकाऱ्यांना नोटीस बजावून त्यांच्याकडून खुलासा घ्यावा. तसेच, दोषी आढळल्यास त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करावी, असेही जिल्हा प्रशासनाने काढलेल्या परिपत्रकात स्पष्ट केले आहे.

संबंधित तहसीलदार, मंडल अधिकारी, ग्राम महसूल अधिकाऱ्यांचे दफ्तर तपासून वरील प्रकार आढळल्यास त्यांच्याकडून खुलासा मागवून घ्यावा. तसेच संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी. त्याबाबतची माहिती जिल्हा प्रशासनाला द्यावी, अशा सूचना उपविभागीय अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. दौऱ्यावेळी ग्राम महसूल अधिकारी, मंडल अधिकाऱ्यांसह तहसीलदार दफ्तर तपासणी करावी, असेही या आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# पुरंदर तालुक्यात संपूर्ण टोलमाफी द्या; खासदार सुप्रिया सुळेंचे नितीन गडकरींना पत्र

**बारामती, ता. २४ :** पुणे पंढरपूर पालखी महामार्ग (राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६५) या महामार्गासाठी पुरंदर तालुक्यातील अनेक शेतकरी आणि व्यावसायिकांनी आपल्या जमिनी दिल्या असून सर्वच पुरंदरवासीयांना या टोलनाक्यावर पूर्णतः माफी मिळावी, अशी मागणी खासदार सुप्रिया सुळे यांनी केंद्रीय रस्ते विकास महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांचेकडे पत्राद्वारे केली. यासंदर्भात राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांना याबाबत सूचना देण्याची विनंती पत्रामध्ये केल्याचे समजते.



पुणे- पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावरील सासवड -जेजुरी दरम्यान बेलसर गावचे हद्दीत तक्रारवाडी फाट्यानजीक टोलनाका निर्माण करण्यात आला असून पुढील महिन्यापासून या टोलनाक्यावरून वाहन चालकांकडून टोल वसुलीस सुरुवात होणार आहे. या अनुषंगाने संभाजी ब्रिगेड, बहुजन हक्क परिषद, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार) आदी विविध सामाजिक संघटना व शेतकरी, व्यावसायिक विशेषतः पुरंदरवासीयांनी टोलमाफी मिळावी, अशी मागणी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणकडे केली होती.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण पुणे येथील कार्यालया मध्ये प्रकल्प अधिकारी संजय कदम, अभिजित आवटे यांनी दिलेल्या माहितीनुसार २० किलो मीटर अंतरावरील पुरंदरवासीयांना ३५० रुपयांच्या मासिक पासाची सवलत देणार असल्याचे सूचित केले होते. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण प्रकल्प अधिकारी यांच्या निर्णयामुळे पुरंदरवासीयांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. सर्वच पुरंदरवासीयांना या टोलनाक्यावर पूर्णतः टोलमाफी मिळावी, अशी मागणी सर्वस्तरातून व सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांतून होत आहे.

### खासदार सुळेंकडून पाठपुरावा

सप्टेंबर २०२५ मध्ये सासवड येथे खासदार सुप्रिया सुळे, पुरंदरमधील लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी यांच्यात बैठक झाली होती. यावेळी सासवड ते जेजुरी या राष्ट्रीय महामार्गावर आवश्यक तेथे उड्डाणपूल निर्माण व्हावेत, पुरंदरवासीयांना टोलमाफी मिळावी, अशी मागणी केली होती. खासदार सुळे यांनी केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे थेट पत्राद्वारे पुन्हा मागणी केली आहे. याबाबत फेसबुक पोस्ट सुद्धा केली आहे.

# उरुळी कांचन येथे उन्नती कन्या विद्यालयाच्या वतीने ग्रामस्वच्छता अभियान

**उरुळी कांचन, ता. २४ :** स्वच्छ गाव, सुंदर गावच्या जोशपूर्ण घोषणांनी उरुळी कांचन परिसर दुमदुमून गेला. राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त (ता. हवेली) येथील पंचक्रोशीतील फक्त मुलींची शाळा म्हणून ओळख असलेल्या इंग्रजी माध्यमाच्या उन्नती कन्या विद्यालयच्या वतीने ग्राम स्वच्छता अभियान उत्साहात राबविण्यात आले.



कार्यक्रमाची सुरुवात गाडगेबाबांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थिनींनी मुख्य बाजारपेठ, ग्राम पंचायत परिसर, महादेव मंदिर, राम मंदिर तसेच आश्रम रोड परिसरात स्वच्छता मोहीम हाती घेतली. ठिकठिकाणी कचरा संकलन करून परिसर स्वच्छ करण्यात आला. यावेळी नागरिकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देत जनजागृती करण्यात आली. याशिवाय विविध ठिकाणी सादर करण्यात आलेल्या पथनाट्यांमुळे वातावरणात वेगळाच उत्साह निर्माण झाला. विद्यार्थिनींच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणाने ग्रामस्थांची मने जिंकली.

दरम्यान, शाळेचे आधारस्तंभ सुरेश तात्या कांचन, अध्यक्षा नयॉन सुरेश कांचन व संचालिका डॉ. नुपूर कांचन यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्राचार्या पद्मादेवी विडप यांच्या निरीक्षणाखाली हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला. उरुळी कांचन ग्रामपंचायतीने शाळेचे विशेष कौतुक केले.

# ...अखेर! थेऊर मारहाण प्रकरणातील गुंगारा देणारा आरोपी जेरबंद

**लोणी काळभोर, ता. २३ :** थेऊर ते कोलवडी रस्त्यावर एकाच कुटुंबातील चार जणांना दुचाकी अडवून शिवीगाळ करत लाकडी बैटन पट्टी व दगडाने बेदम मारहाण केल्याच्या बकासुर प्रकरणातील फरार आरोपीला अखेर लोणी काळभोर पोलिसांनी अटक केली आहे. तब्बल दोन महिन्यांपासून पोलिसांना चकवा देणाऱ्या आरोपीला पकडण्यात पोलिसांना यश आले आहे.




प्रसाद धनाजी सोनवणे (रा. थेऊर, ता. हवेली, जि. पुणे) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. या प्रकरणात यापूर्वी अक्षय धनाजी सोनवणे, सविता धनाजी सोनवणे (रा. थेऊर) आणि बकासुर (पूर्ण नाव व पत्ता अज्ञात) यांना पोलिसांनी अटक केली होती. याप्रकरणी तनिष्का गणेश नायक (वय १९, रा. गावठेवस्ती, साई विश्व सोसायटी, मांजरी बुद्रुक, ता. हवेली) यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तनिष्का नायक या आपल्या पती गणेश नायक, सासू अंबिका नायक, सासरे दिलीप नायक आणि नणंद लक्ष्मी यांच्यासह मोटारसायकलवरून घरी जात होत्या. २६ डिसेंबर २०२५ रोजी रात्री सुमारे ८ ते १० वाजण्याच्या दरम्यान थेऊर-कोलवडी रस्त्यावर श्री चिंतामणी विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर हा प्रकार घडला.

यावेळी अक्षय सोनवणे, प्रसाद सोनवणे आणि बकासुर यांनी त्यांची दुचाकी अडवून शिवीगाळ सुरू केली. त्यानंतर अक्षय व प्रसाद सोनवणे यांनी लाकडी बैटन पट्टीने तनिष्का नायक, अंबिका नायक आणि लक्ष्मी यांना मारहाण केली. तर बकासुर याने रस्त्याच्या कडेला पडलेला दगड उचलून तनिष्का नायक यांच्या कपाळावर मारल्याने त्या जखमी झाल्या. तसेच इतरांनाही हाताने मारहाण करून धमकावण्यात आले.

याप्रकरणी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ११५ (१), ११८ (१), १२५, ३५२, ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल होताच पोलिसांनी तिघांना अटक केली होती. मात्र प्रसाद सोनवणे हा तेव्हापासून फरार होता. अखेर पोलिसांनी शोधमोहीम राबवून त्याला थेऊर परिसरातून अटक केली. न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे व पोलीस निरीक्षक (गुन्हे) स्मिता पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक दिगंबर सोनटक्के, रत्नदीप बिराजदार, पोलीस हवालदार दिगंबर जगताप, पोलीस अंमलदार अमोल जाधव व त्यांच्या पथकाने केली.

## संक्षिप्त

### अजित पवारांच्या शोकसभेत नाना पाटेकर भावुक



**वरळी, ता. २४ :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या निधनानंतर काल मुंबईतील वारली डोम याठिकाणी शोकसभेचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या शोकसभेला देशातील आणि राज्यातील दिग्गज नेते उपस्थित आहेत. उद्योगपती आणि कलाकारांनीही हजेरी लावली आहे. या कार्यक्रमात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील महत्त्वाचे नेते उपस्थित होते. शोकसभेत ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांनी अजित पवार यांना श्रद्धांजली वाहत नमस्कार..माझा आणि दादांचा ५० वर्षांचा खूप मोठा सहवास आहे. खूप जास्त आठवणी आहेत, असं नाना पाटेकर म्हणाले. आज या ठिकाणी इतकी मंडळी जमली आहेत, शोकसभेच्या ठिकाणी जर दादांचा आज ७५वा वाढदिवस साजरा करायला जमलो असतो, तर जास्त बरं वाटलं असतं, असं म्हणत नाना पाटेकर यांनी अजित पवार यांच्या तसबीरासमोर हात जोडले, तसेच व्यासपीठावरुन भावुक होऊन खाली उतरले.

### सेवानिवृत्त अधिकाऱ्याला ६ कोटींचा गंडा

**पुणे, ता. २४ :** पुण्यातील नारायण पेठ सारख्या भागातून एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. सांडपाणीची पाईप लाईन दुरुस्ती करण्याच्या साध्या बहाण्याने एका सेवानिवृत्त अधिकाऱ्याची तब्बल ६ कोटी ७० लाख रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. गेल्या दोन वर्षांपासून चाललेला हा 'ब्लॅकमेलिंग'चा खेळ अखेर पोलिसांच्या कारवाईमुळे उघड झाला असून, विश्रामबाग पोलिसांनी मुख्य आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत. संदीप उर्फ सोनू चव्हाण या आरोपीने स्वतःला महानगरपालिकेचा कॅन्ट्राटदार असल्याचे भासवले. तुमच्या घराजवळील ड्रेनेज लाईनमध्ये झाडांची मुळे शिरली आहेत, त्यामुळे संपूर्ण लाईन बदलावी लागेल, असे त्याने सांगितले. महापालिकेची परवानगी, चलन भरणे आणि यंत्रसामग्रीचा खर्च अशा तांत्रिक गोष्टी सांगून त्याने सुरुवातीला पैसे उकळण्यास सुरुवात केली. एकदा पैसे मिळाल्यावर आरोपीने धमकावण्याचे सत्र सुरू केले. आरोपीने कधी स्वतःच्या मुलाच्या शस्त्रक्रियेचे खोटे कारण दिले, तर कधी फोन करून दबाव टाकला. दोन वर्षे हा ज्येष्ठ नागरिक दहशतीखाली सगळं काही सहन करत होते. घरात साठवलेली पुंजी आणि आयुष्यभराची कमाई गुन्हेगारांनी लंपास केली.

### लाडकी बहीण योजनेत भ्रष्टाचार ; आदित्य ठाकरेंचा सरकारवर प्रहार

**मुंबई, ता. २४ :** राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात शिवसेना उबाठा आमदार आदित्य ठाकरे यांनी विविध मुद्द्यांवरून सरकारला चांगलेच धारेवर धरले. लाडकी बहीण योजनेतून अनेक पात्र महिलांची नावे वगळण्यात आल्याचा गंभीर आरोप करत, भ्रष्टाचारामुळे राज्याच्या तिजोरीवर नाहक भार पडत असल्याची टीका त्यांनी केली. मुंबईतील ढासळती हवेची गुणवत्ता आणि वाढत्या प्रदूषणाकडे लक्ष वेधताना, पर्यावरण मंत्र्यांनी केवळ छापील उत्तरे न देता प्रत्यक्ष परिस्थिती पाहावी, असा टोलाही त्यांनी लगावला. राज्यातील अल्पवयीन मुली बेपत्ता होण्याचे प्रमाण आणि पुण्यात काँग्रेस प्रवक्त्यांवर झालेला हल्ला यावरून त्यांनी गृहखात्याच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. तसेच, दोन्ही सभागृहात विरोधी पक्षनेता नसण्यावरून भाजपवर निशाणा साधत त्यांनी सरकारच्या कारभाराचा तीव्र निषेध नोंदवला.

### मुनगंटीवारांनी कदमांची उडाली त्रेधातिरपीट

**मुंबई, ता. २४ :** महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी भाजपचे ज्येष्ठे नेते सुधीर मुनगंटीवार यांनी नागरी अन्नपुरवठा विभागाचे राज्यमंत्री योगेश कदम यांची चांगलीच खरडपट्टी काढली. राज्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना बोनस देण्याच्या मुद्द्यावरून मुनगंटीवार यांनी योगश कदम यांच्या प्रश्नांची सरबत्ती केली. लक्षवेधीवर बोलताना मंत्र्यांनी अभ्यास करू यायला हवे. चुकीची आकडेवारी देऊ नये. तसेच मुख्यमंत्र्यांशी बोलतो, बैठक लावतो, चर्चा करतो, मंथन करतो हे चालत नाही. मी काय तुम्हाला उखाणे घ्यायला सांगतोय का? अशा शब्दात मुनगंटीवार यांनी योगेश कदम यांना सुनावले.

### लाडक्या बहिणींच्या खात्यात पैसे जमा होण्यास सुरुवात

**मुंबई, ता. २४ :** लाडक्या बहिणींसाठी आनंदाची बातमी आहे. लाडक्या बहिणींच्या खात्यात पैसे जमा होण्यास सुरुवात झाली आहे. राज्य सरकारने महिलांना मोठं गिफ्ट दिलं आहे. फेब्रुवारी महिना संपत आला तरीही खात्यात पैसे जमा न झाल्याने अनेक महिलांच्या मनात संभ्रम निर्माण झाला होता. त्यानंतर आता सरकारने थेट महिलांच्या खात्यात पैसे जमा केले आहेत. राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी लाभार्थी महिलांना अनपेक्षित गिफ्ट मिळालं आहे. त्यामुळे महिलांना दिलासा मिळाला आहे. जानेवारीचा हप्ता जमा होण्यास सुरुवात केली आहे. काल संध्याकाळी अनेक महिलांच्या खात्यात पैसे जमा झाले आहेत.

# अजित पवारांच्या अपघातग्रस्त विमानाचा तीन हजार तासांचा रेकॉर्डच उपलब्ध नाही

## आमदार रोहित पवारांच्या दाव्याने खळबळ

**मुंबई, ता. २४ :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे अपघाती निधन झाले असून त्यांचा घातपात झाला असल्याचा दावा अजित पवारांचे पुतणे आणि आमदार रोहित पवार यांनी केला आहे. त्यामुळे या प्रकरणी त्यांनी सखोल चौकशीची मागणी केली आहे. या चौकशीअंतर्गत येणाऱ्या प्रत्येक गोष्टीकडे रोहित पवारांचं जातीने लक्ष आहे. त्यातच, त्यांनी आता या चौकशीबाबत आज एक एक्स पोस्ट केली आहे.




रोहित पवार पोस्टमध्ये म्हणाले, स्व.अजित दादांच्या अपघातातील विमानाच्या चौकशीच्या निमित्ताने रोहित सिंगला काल पायलट म्हणून चौकशीसाठी बोलवण्यात आल्याची माहिती मिळत असून काल रोहित सिंग देशात आला होता. तसेच VSR कडे विमानाच्या ५००० तासांपैकी केवळ १८०० ते २००० तासांचा रेकॉर्ड उपलब्ध असून उर्वरित ३००० तासांचे रेकॉर्डस उपलब्धच नसल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. या मिसिंग रेकॉर्डची हेराफेरी, बनवाबनवी तडठ ला करता यावी यासाठी चौकशी जाणूनबुजून लांबवली जात आहे का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे.

महाराष्ट्राचा लोकनेता गेला असताना अपघाताला जबाबदार कंपनीच्या मालकाला केवळ पायलट म्हणून चौकशीसाठी बोलावले जात असेल तर याचा अर्थ काय घ्यायचा? दादांच्या अपघाताच्या गुन्हेगारी अँगलची चौकशी उखडू करत असताना VSR चा मालक भारतात आला असेल तर DGC ने CID ला कळवणे आवश्यक का समजले नाही? असा प्रश्न रोहित पवारांनी विचारला आहे.

विमानाबाबत रोहित पवार आधी काय म्हणाले होते? दरम्यान, अजित पवारांचा २८ जानेवारी रोजी विमान अपघातात मृत्यू झाला. या अपघातामागे घातपाताची शक्यता रोहित पवारांनी वर्तवली आहे. त्यामुळे त्यांनी सातत्याने यावर मुंबई आणि दिल्लीत पत्रकार परिषद घेऊन त्यांनी त्यांच्या पातळीवर केलेल्या तपासातील काही मुद्दे माध्यमांसमोर मांडले. यातून ब्लॅक बॉक्सची माहिती, अपघातग्रस्त विमानाच्या कँपनीच्या मालकाची माहिती, त्यांना असलेले कथित राजकीय वरदहस्त याबाबत त्यांनी सातत्याने चर्चा केली आहे.

त्यावेळी त्यांनी या विमानाची ५ हजार तास उडण्याची क्षमता होती. ज्यावेळी अजित पवारांना हे विमान सेवेसाठी दिलं तेव्हा फक्त १० ते १५ तासच शिल्लक होते. त्यामुळे असे विमान अजित पवारांना दिलेच नव्हते पाहिजे, असं रोहित पवार म्हणाले. तसंच हे विमान ८ हजार तासांहून अधिक काळ उडाले असण्याचीही शक्यता त्यांनी वर्तवली होती. त्यातच, आता त्याचा रेकॉर्डच उपलब्ध नसल्याचा दावा त्यांनी केला आहे.

### कंटेनर फसल्याने जुन्या मुंबई- पुणे हायवेवर वाहतूक कोंडी

**पिंपरी-चिंचवड, ता. २४ :** जुन्या पुणे-मुंबई महामार्गावर प्रवास करणाऱ्या प्रवाशांची आजची सकाळ वाहतूक कोंडीत गेली. पिंपरी महापालिका भवनासमोर असलेल्या मोरवाडी चौकातील ग्रेड सेपरेटरमध्ये एक अवजड कंटेनर अडकल्याने या मार्गावरील वाहतुकीचा अक्षरशः खोळंबा झाला. तासन्‌ तास चाललेल्या या गोंधळामुळे कामावर जाणाऱ्या चाकरमान्यांचे आणि प्रवाशांचे प्रचंड हाल झाले. वर्दळीच्या वेळी कंटेनर मोरवाडी चौकातील ग्रेड सेपरेटरमध्ये शिरला. वास्तविक, या बोगद्याची उंची मर्यादित असून तेथे अवजड वाहनांना बंदी असल्याचे फलक स्पष्टपणे लावलेले आहेत. मात्र, उंचीचा अंदाज न आल्याने किंवा नियमांकडे दुर्लक्ष केल्यामुळे हा कंटेनर मध्यभागीच अडकला. कंटेनरची उंची बोगद्यापेक्षा जास्त असल्याने तो पुढेही जाईना आणि मागेही येईना, अशी स्थिती निर्माण झाली.

# मुलांनी मराठी भाषेतूनच शिक्षण घेणे गरजेचे; लोकसेवा आयोगाचे माजी अध्यक्ष किशोरराजे निंबाळकर

**पुणे, ता. २४ :** आजकाल स्टेटस सिम्बॉल म्हणून मुलांना इंग्रजी शाळेत टाकले जाते. मात्र, मुलांनी मराठी भाषेतूनच शिक्षण घेणे गरजेचे आहे. हा बदल घडवण्याची सुरुवात शासकीय अधिकाऱ्यांनीच केली पाहिजे, अशी भूमिका महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे माजी अध्यक्ष किशोरराजे निंबाळकर यांनी मांडली.

शासकीय अधिकाऱ्यांच्या मराठी साहित्य संमेलनाच्या समारोप कार्यक्रमात निंबाळकर बोलत होते. संमेलनाध्यक्ष महेश भागवत, माजी सहकार आयुक्त अनिल कवडे, यशदाचे अतिरिक्त महासंचालक शेखर गायकवाड, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, गुजरातचे जीएसटीचे प्रधान आयुक्त सुरेंद्रकुमार मानकोसकर या वेळी उपस्थित होते.




निंबाळकर म्हणाले, आपला देश विविध भाषा, प्रांत यांनी नटलेला आहे. शासकीय अधिकाऱ्यांना या विविध भागांमध्ये काम करण्याची संधी मिळत असते. त्यांना ज्या-ज्या भागात जाण्याची संधी मिळते त्यांनी त्या-त्या ठिकाणच्या अनुभवांवर लेखन केले पाहिजे. विविध भाषांमधील पुस्तके आपल्या भाषेत येणे गरजेचे आहे.

शासकीय सेवा हे समाजसेवेचे उत्तम माध्यम आहे. माणसांना सर्वाधिक पाहण्याची, अनुभवण्याची संधी अधिकाऱ्यांना मिळते. या संधीचा उपयोग आपण कसा करतो, हे महत्त्वाचे आहे. प्रतिभेचे, भावनेचे प्रकटीकरण जसे आवश्यक आहे, तसेच, आत्मचिंतनही सध्याच्या काळात गरजेचे झाले आहे. आपण काय कमावले आणि काय गमावले हे पडताळून पाहायला हवे, अशी भावना कवडे यांनी व्यक्त केली.

साहित्याच्या माध्यमातून नेमकेपणाने बोट ठेवता यायला हवे. प्रबोधनाचा मार्ग हा साहित्यनिर्मितीतून जातो, हे लक्षात ठेवून चांगले आचार-विचार समाजात रुजवण्यासाठी शासकीय अधिकाऱ्यांनी पुढाकार घेणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. राजीव नंदकर यांनी सूत्रसंचालन केले. सुनील महाजन यांनी आभार मानले.



## मुंढवा जमीन घोटाळा प्रकरणी दिग्विजय पाटीलला अटक होणार?

**पुणे, ता. २४ :** मुंढवा जमीन घोटाळा प्रकरणात गुन्हा दाखल असलेल्या दिग्विजय पाटीलने पुणे सत्र न्यायालयातील त्याचा अटकपूर्व जामीन अर्ज मागे घेतला आहे. दिग्विजय पाटीलने त्याच्यावर गुन्हा दाखल झाल्यानंतर अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला होता. मात्र या प्रकरणात पोलिसांनी दोषारोपपत्र दाखल केल्यानंतर नवीन मुद्यांच्या आधारे पुन्हा अटकपूर्व जामीन अर्ज दाखल करण्यासाठी दिग्विजय पाटीलने आधी केलेला अर्ज मागे घेतल्याची माहिती आहे. दिग्विजय पाटील हा पार्थ पवार यांचा मामेभाऊ आहे. दिग्विजय पाटीलकडून या प्रकरणात वेळकाढूपणा करण्याचा हा प्रयत्न मानला जात आहे. दिग्विजय पाटीलने आधी केलेला अर्ज मागे घेतल्याने नियमानुसार पुणे पोलीस दिग्विजय पाटीलला अटक करु शकतात. मात्र, पार्थ पवार यांचा नातेवाईक असलेल्या दिग्विजय पाटीलला पुणे पोलीस अटक करणार की त्याला नव्याने अटकपूर्व अर्ज दाखल करण्याची संधी देणार याकडे सगळ्यांचं लक्ष असणार आहे.

# वरचे बटण ४० वर्षे असेच खुले राहील

## अजितदादांच्या आठवणीने रोहित पवारांना अश्रू अनावर

**मुंबई, ता. २४ :** विधानसभेत सोमवारी अजित पवार यांच्या शोकप्रस्तावावर बोलताना त्यांचे पुतणे व राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांना अश्रू अनावर झाले. अजितदादा पवार नावाचा जादूगार संबंध महाराष्ट्राला हसवत हसवत गेला, असे सांगताना त्यांचा कंठ दाटून आला.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडलेल्या शोकप्रस्तावावर बोलताना रोहित पवार यांनी अजितदादांच्या अनेक आठवणी जड अंतःकरणाने सांगितल्या. दादा नेहमी मला सांगायचे की, रोहित तुझे शर्टचे वरचे बटण लावत जा. आता ४०-५० वर्षांनंतर जेव्हा वर त्यांची भेट होईल, तेव्हाच मी हे बटण त्यांच्यापुढे लावेन. तोपर्यंत हे बटण असेच खुले राहील, कारण ते मला रोज दादांची आठवण करून देईल, असे ते म्हणाले.

रोहित पवार यांनी आपल्या केसांबाबतही एक हृदयस्पर्शी आठवण सांगितली. दादांनी एकदा त्यांना केस कमी करण्यास सांगितले होते. दादा गेल्यावर त्यांनी आदरांजली म्हणून केस कापले. तसेच दादांनी शारीरिक वजन कमी करून राजकीय वजन वाढवण्याचा सल्ला दिला होता, तोही पाळेल, असे त्यांनी सांगितले. दादांच्या अपघातासाठी जे कोणी दोषी असतील, त्यांना तुरुंगात टाकल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही, असा निर्धारही रोहित पवार यांनी यावेळी व्यक्त केला. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना राजकीय प्रवासात सर्वतोपरी साथ देण्याचे वचनही त्यांनी दिले. देवेंद्र फडणवीस यांना अजितदादांवरील सर्व खोटे आरोप पुसून खऱ्या अर्थाने आदरांजली वाहण्याची विनंतीही त्यांनी केली.

# नगर–दौंड महामार्गावर अपघात; एकाच कुटुंबातील तिघांसह चालकाचा मृत्यू

**अहिल्यानगर, ता. २४ :** नगर-दौंड महामार्गावरील कोळगाव शिवारात मंगळवारी पहाटे तीन वाजेच्या सुमारास ट्रक आणि मारुती इको या दोन वाहनांचा भीषण अपघात झाला. या अपघातात इको गाडीतील चालकासह इतर तिघांचा जागीच मृत्यू झाला. मृतांमध्ये एकाच कुटुंबातील तिघांचा समावेश असून, या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.



नितीन कोकाटे (वय २२, रा. काष्टी, चालक), गजानन जनार्धन पायघन (वय ४७), दुर्पा गजानन पायघन (वय- ३६) आणि वैभव गजानन पायघन (वय १९) अशी मृतांची नावे आहेत. या अपघातात करण गजानन पायघन (वय १३) हा मुलगा गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर सध्या खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

पायघन कुटुंबीय मूळचे अकोला जिल्ह्यातील पातूर तालुक्यातील मळतूर येथील रहिवासी आहेत. कामानिमित्त ते सध्या श्रीगोंदा तालुक्यातील चिंभळे गावात वास्तव्यास होते. काष्टी येथील चालक नितीन कोकाटे याला घेऊन ते आपल्या मूळ गावी गेले होते. २३ तारखेला रात्री ते पुन्हा चिंभळे येथे येण्यासाठी निघाले होते. मात्र, पहाटे तीनच्या सुमारास कोळगाव शिवारातील माऊली मंदिर परिसरात त्यांची गाडी आली असता, दौंडहून नगरकडे जाणाऱ्या ट्रकने त्यांच्या गाडीला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, इको गाडीचा चक्काचूर होऊन चौघांचा जागीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच बेलवंडी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर, दादासाहेब क्षीरसागर यांच्यासह पोलीस कर्मचाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने गाडीत अडकून पडलेले मृतदेह बाहेर काढले. सर्व मृतदेह शवविच्छेदनासाठी श्रीगोंदा येथील ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आले आहेत. याप्रकरणी बेलवंडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू असून, पोलीस पुढील तपास करत आहेत.

# माझ्यावर पिस्तुल रोखून झालेला हल्ला सुनियोजित : हनुमंत पवार

**पुणे, ता. २४ :** शहरातील मित्र मंडळ चौक परिसरात काँग्रेसचे प्रवक्ते हनुमंत पवार यांच्यावर काल हल्ला झाल्याची घटना घडली. या प्रकरणी भाजप कार्यकर्त्यांवर मारहाणीचे आरोप करण्यात आले असून, घटनेनंतर राजकीय वातावरण तापले आहे.



या हल्ल्याविषयी हनुमंत पवार यांनी हल्ला सुनियोजित असल्याचा आरोप केला. सहा जणांनी एकत्र येत आपल्यावर जीवघेणा हल्ला केल्याचे त्यांनी म्हटले आहे. माझ्यावर पिस्तुल रोखून जीवे मारण्याचा प्रयत्न करण्यात आला. शारीरिक मारहाणही करण्यात आली. तरीही संबंधितांना पोलिसांनी सोडून दिले. सरकार नेमके कुणाच्या पाठिशी आहे? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. गृहमंत्र्यांच्या अधिपत्याखालील पोलिसांनी कारवाई न केल्याचा आरोपही त्यांनी केला. पवार यांनी या घटनेचा निषेध करताना पुण्याच्या राजकीय परंपरेचा उल्लेख केला. हे शहर महात्मा फुले, सावित्रीबाई फुले आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांचे आहे. येथे द्वेषाचे राजकारण चालणार नाही, असे ते म्हणाले. पुण्याच्या सुसंस्कृत राजकीय परंपरेला धक्का देण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

तसेच, काँग्रेस भवनावर दगडफेक झाल्याचा दावा करत पवार यांनी सांगितले की, स्वातंत्र्य चळवळीचे साक्षीदार असलेल्या या भवनाला लक्ष्य करण्यात आले. काकासाहेब गाडगीळ, केशवराव जेधे, यशवंतराव चव्हाण, पंडित जवाहरलाल नेहरू आणि नेताजी सुभाषचंद्र बोस यांसारख्या नेत्यांच्या कार्याशी संबंधित ठिकाणावर हल्ला झाल्याचे त्यांनी नमूद केले.

स्वातंत्र्य चळवळीत योगदान देणाऱ्या पक्षाच्या कार्यकर्त्यांवर हल्ले होतात, आमच्या कार्यकर्त्यांची डोकी फोडली जातात आणि उलट आमच्यावरच गुन्हे दाखल केले जातात. अशा धमक्यांना आम्ही घाबरणार नाही, असा इशाराही पवार यांनी दिला.

# देहू–आळंदी पालखी मार्गावरील कामे १५ मे पूर्वी पूर्ण करावीत : जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी

**राहुलकुमार अवचट**

आंळदी, ता. २४ : आगामी आषाढी वारी पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर देहू व आळंदी पालखी मार्गावरील विविध विकासकामे १५ मे पूर्वी पूर्ण करण्यात यावीत, अशी स्पष्ट सूचना जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी संबंधित विभागांना दिल्या आहेत. देहू व आळंदी संस्थानांकडून प्राप्त मागण्यांवर सकारात्मक भूमिका घेत प्रशासनामार्फत ठोस कार्यवाही करण्याची ग्वाही जिल्हाधिकारी यांनी दिली. देहू ते देहू रोड या पाच किलो मीटरच्या रस्त्याच्या रुंदीकरणाबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील तीन किलो मीटर तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील दोन किलोमीटरचे काम संबंधित संस्थेमार्फत पूर्ण करण्यात यावे, असे निर्देश देण्यात आले. या कामासाठी आवश्यक असलेले देहूरोड कस्टम मंडळाचे नाहरकत प्रमाणपत्र मिळविण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून पाठपुरावा करण्यात येईल, असे सांगण्यात आले. देहू येथील मंदिरापर्यंतचा सुमारे ५०० मीटर रस्ता नगरोत्थान योजनेतून पूर्ण करण्यात येणार आहे. संत तुकाराम महाराज पालखीचा पहिला मुक्काम आकुर्डी येथे होत असल्याने जागेअभावी तात्पुरती जागा उपलब्ध करून देण्याबाबत संयुक्त पाहणी करून निर्णय घेण्याचे निर्देश देण्यात आले. काळभोरनगर ते आकुर्डी येथील मेट्रोचे काम पालखीपूर्वी पूर्ण करावे, तसेच लोणी काळभोर येथील पालखी मुक्कामासाठी जागा वाढवून देण्यात येईल. गवळ्याची उंडवडी, सणसर व निमगाव केतकी येथील पालखी मुक्कामाच्या जागेचा प्रश्न प्रशासनामार्फत सोडविण्यात येईल, असेही स्पष्ट करण्यात आले.



आळंदी संस्थानाकडून आलेल्या मागण्यांबाबतही ठोस भूमिका घेत प्रशासनाला मुदत निश्चित करून कामे पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गावरील संचेतीपासून एफ. सी. रोडपर्यंत रात्री अखंडित प्रकाश व्यवस्था राहील याची खात्री करण्याचे निर्देश देण्यात आले. बोरावके मळा ते सासवड दरम्यान नव्याने झालेल्या बायपास मार्गावरील अडथळे दूर करण्यात येतील. दिवेघाट येथे आवश्यक त्या ठिकाणी बॅरिकेड्स उभारण्यात येतील. पालखी मार्गावर कोणतीही वाहन बंद पडल्यास वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी पालखी सोबत क्रेनची व्यवस्था ठेवण्याची दक्षता प्रशासन व पोलीस विभाग घेतील.

निरा येथील जुना पूल तात्काळ पाडण्याचे निर्देशही जिल्हाधिकारी यांनी दिले. आळंदी येथील प्रलंबित रस्त्यांची कामे, त्यासाठी आवश्यक निधी उपलब्धता तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीपर्यंतच्या मोठ्या रस्त्यांच्या कामांना गती देण्याच्या सूचना संबंधित उपविभागीय अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. आळंदी नगरपालिका क्षेत्रातील रस्तेरुंदीकरणाची कार्यवाही अधिक वेगाने पूर्ण करण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले. परतीच्या वारीदरम्यान आवश्यकतेनुसार रुग्णवाहिका उपलब्ध ठेवण्याच्या सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. या बैठकीत आळंदी व देहू संस्थानांच्या पदाधिकाऱ्यांनी प्रशासनाने तातडीने बैठक घेऊन मागण्यांवर सकारात्मक भूमिका घेतल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

# पोलिस भरती प्रक्रियेत उत्तेजक द्रव्य आढळल्याने तरुणाला अटक




**ठाणे, ता. २४ :** ठाणे जिल्ह्यातील मीरा-भाईंदर येथे सुरू असलेल्या पोलीस भरती प्रक्रियेदरम्यान एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पोलीस दलात भरती होऊन खाकी वर्दी मिळवण्याचे स्वप्न पाहणाऱ्या एका तरुणाला चुकीचा मार्ग अवलंबल्यामुळे अटक करण्यात आली आहे. शारीरिक चाचणीपूर्वी शरीरात उत्तेजक द्रव्य इंजेक्शनद्वारे घेण्याचा प्रयत्न करत असताना पोलिसांनी त्याला रंगेहात पकडले. या घटनेमुळे भरतीसाठी आलेल्या इतर उमेदवारांमध्ये खळबळ उडाली आहे.

मीरा-भाईंदरमधील नेताजी सुभाषचंद्र बोस मैदानावर सध्या पोलीस भरती प्रक्रिया सुरू आहे. येथे उमेदवारांची शारीरिक चाचणी घेण्यात येत आहे. भरती प्रक्रिया पारदर्शक आणि निष्पक्ष राहावी तसेच कोणताही गैरप्रकार होऊ नये यासाठी अमली पदार्थ विरोधी पथकाचे अधिकारी साध्या वेशात मैदान परिसरात गस्त घालत होते. याच वेळी एका तरुणाच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने पोलिसांनी त्याच्यावर लक्ष ठेवले.

तपासादरम्यान हा तरुण स्वतः च्या शरीरात इंजेक्शनद्वारे उत्तेजक द्रव्य टोचण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसून आले. पोलिसांनी तातडीने कारवाई करत त्याला ताब्यात घेतले. अटक करण्यात आलेल्या तरुणाचे नाव साहिल शंकर अजवेके असून त्याचे वय २३ वर्ष आहे. तो पुणे जिल्ह्यातील बारामती येथील रहिवासी आहे. धावण्याच्या चाचणीत चांगली कामगिरी करता यावी आणि शारीरिक क्षमता वाढावी या उद्देशाने त्याने हे कृत्य केल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

या प्रकरणी मीरा-भाईंदर पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे. पोलीस भरतीसारख्या महत्त्वाच्या प्रक्रियेत गैरप्रकार करण्याचा प्रयत्न केल्यामुळे संबंधित तरुणाचे पोलीस होण्याचे स्वप्न धुळीस मिळाले आहे. या घटनेमुळे भरती प्रक्रियेत नियमांचे काटेकोर पालन किती महत्त्वाचे आहे, याची पुन्हा एकदा जाणीव झाली आहे.

# भाजपची प्रदेश कार्यकारिणी जाहीर

## राजेश पांडे यांची सरचिटणीस म्हणून फेरनिवड; ओबीसी मोर्चा अध्यक्षपदी योगेश टिळेकर

**मुंबई, ता. २४ :** गेल्या अनेक महिन्यांपासून रखडलेल्या महाराष्ट्र भाजपच्या प्रदेश कार्यकारिणीला अखेर मुहूर्त मिळाला आहे. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी मंगळवारी नवी टीम जाहीर केली. केवळ रखडलेल्या नियुक्त्या मार्गी लावणे हाच यामागील हेतू नसून, आगामी विधानसभा आणि लोकसभा निवडणुकांचे गणित डोळ्यासमोर ठेवून ही कार्यकारणी जाहीर करण्यात आली आहे.

रवींद्र चव्हाण यांनी प्रदेशाध्यक्षपदाची सूत्रे हाती घेऊन ८ महिने उलटले तरी जुन्याच टीमकडून काम सुरू होते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वारे आणि पक्षातील अंतर्गत ओढाताण यामुळे कार्यकारणी जाहीर करण्याचा निर्णय लांबणीवर पडला होता.



भाजपने आपल्या नव्या फळीत सुजय विखे पाटील, गोपीचंद पडळकर, भारती पवार आणि अर्चना पाटील चाकूरकर यांसारख्या दिग्गज चेहऱ्यांना उपाध्यक्ष म्हणून संधी दिली आहे. तर मुख्य प्रवक्तेपदी नवनाथ बन यांची वर्णी लागली आहे.

भाजप युवा मोर्चाच्या अध्यक्षपदी कृष्णराज महाडिक यांची नियुक्ती केली आहे. विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि कोकण अशा सर्व भागातील नेत्यांना प्रतिनिधित्व देऊन आगामी निवडणुकांना डोळ्यासमोर ठेऊन निर्णय घेण्यात आला आहे.

प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी स्पष्ट केले की, संधी मर्यादित असल्याने सर्वांनाच पद देणे शक्य नाही, मात्र जे राहून गेले आहेत त्यांना इतर आघाड्यांमधून कामाची संधी दिली जाईल. पक्षाचे सरचिटणीस म्हणून निरंजन डावखरे, संजय कुटे, माधवी नाईक, राजेश पांडे, सुनील राणे आणि योगेश सागर यांच्यावर मोठी जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

तसेच, महिला मोर्चाच्या अध्यक्षपदी चित्रा वाघ, ओबीसी मोर्चाच्या अध्यक्षपदी योगेश टिळेकर आणि कोषाध्यक्षपदी मिहिर कोटेचा यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

प्रमुख पदे आणि जबाबदाऱ्या मुख्यप्रवक्ता : नवनाथ बन, भाजप युवा मोर्चा अध्यक्ष: कृष्णराज महाडिक भाजप महिला मोर्चा अध्यक्ष: चित्रा वाघ, भाजप ओबीसी मोर्चा अध्यक्ष : योगेश टिळेकर, कोषाध्यक्ष : मिहिर कोटेचा.

भाजप प्रदेश उपाध्यक्ष : केशव उपाध्ये, गोपीचंद पडळकर, अतुल काळसेकर, भारती पवार, संजय कोरगे, संजय भेंडे, रामदास कडस, प्रिया शिंदे, सुजय विखे पाटील, अर्चना पाटील चाकूरकर.

भाजप प्रदेश सरचिटणीस : निरंजन डावखरे, संजय कुटे, सुनिल राणे, योगेश सागर, माधवी नाईक, राजेश पांडे.

भाजप प्रदेश चिटणीस : संजय कुटे, परिणय फुके, वर्षा डहाळे, मंगेश चव्हाण, रोहिणी नायडू, राम सातपुते, प्रविण घुगे, संजय जगताप, अर्चना डेहणकर, रेखा कुलकर्णी, भैरवी घाक.

# महिलेच्या गळ्यातील ६ तोळ्यांचे सोन्याचे दागिने लुटणारा चोरटा जेरबंद

**शिरूर, ता. २४ :** शिरूर तालुक्यातील शरदवाडी परिसरातील जांबुत-जोरीलवन येथे ९० वर्षीय ज्येष्ठ महिलेच्या गळ्यातील सुमारे ४ लाख ८० हजार रुपये किमतीचे सहा तोळे सोन्याचे दागिने जबरदस्तीने हिसकावून नेणाऱ्या आरोपीला शिरूर पोलिसांनी अवघ्या २४ तासांत अटक केली. चोरीस गेलेले सर्व दागिने हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे.

या घटनेबाबत शिरूर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवारी (ता. २० ) दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास फिर्यादी नातेवाईकांसह लग्नकार्याकरिता बाहेर गेले असताना त्यांच्या घरासमोरील व्हरांड्यात बसलेल्या त्यांच्या आई लहानूबाई सखाराम सरोदे (वय ९०) यांच्या




गळ्यातील सहा तोळे सोन्याचे दागिने एका अज्ञात इसमाने बळजबरीने हिसकावून नेले. या दागिन्यांची अंदाजे किंमत ४ लाख ८० हजार रुपये आहे.

या प्रकरणी फिर्यादी मच्छिंद्र सखाराम सरोदे (रा.शरदवाडी, जांबुत- जोरीलवन, ता. शिरूर, जि. पुणे) यांनी शिरूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाला आरोपीचा शोध घेण्याचे आदेश देण्यात आले. तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे तपास सुरू करण्यात आला. या दरम्यान आरोपी आकाश किसन मेरगळ (वय २०, रा. पंचतळे- जांबुत, ता. शिरूर, जि. पुणे) याला ताब्यात घेऊन सखोल चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्याच्याकडून चोरीस गेलेले सहा तोळे वजनाचे, ४ लाख ८० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले आहेत. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक करांडे करीत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल, अपर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संदेश केंजळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक करांडे, पोलीस उपनिरीक्षक शुभम चव्हाण तसेच पोलीस अंमलदार नितेश थोरात, सचिन भाई, विजय शिंदे, निरज पिसाळ, निखिल रावडे, अजय पाटील, दादाराव नागरे, भाऊसाहेब ठोसरे, शंकर बल्लाळ यांच्या पथकाने केली.

या घटनेमुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र पोलिसांच्या तत्पर कारवाईमुळे आरोपीला अटक होऊन चोरीचा मुद्देमाल हस्तगत झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.



# खराडीत फटाके फोडणाऱ्या बुलेटस्वारांवर पोलिसांची धडक कारवाई..

**अमित मुंडीक**

पुणे, ता. २४ : खराडी परिसरात बुलेट गाड्यांच्या मॉडिफाईड सायलेन्सरमधून फटाक्यांसारखा कर्णकर्कश आवाज करून नागरिकांना त्रास देणाऱ्या वाहनचालकांवर पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. खराडी पोलीस स्टेशन हद्दीत वारंवार तक्रारी येत असल्याने पेट्रोलिंगदरम्यान सापळा रचून ४५ बुलेट व इतर दुचाकी वाहनांवर म ोटार वाहन अधिनियमांतर्गत कारवाई करण्यात आली.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक राहुल कोळपे व त्यांच्या पथकाने संबंधित वाहनांचे मॉडिफाईड सायलेन्सर काढून टाकले आणि कंपनीचे मूळ सायलेन्सर बसविण्यात आले. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर दंडात्मक कारवाईही करण्यात आली.

जप्त केलेले मॉडिफाईड सायलेन्सर बुलडोझरखाली नष्ट करण्यात आले. या कठोर कारवाई मुळे परिसरातील बुलेटस्वारांमध्ये धाक निर्माण झाला असून, भविष्यात अशा प्रकारे कर्णकर्कश आवाज करणाऱ्यांविरोधात तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ



## जवस खाण्यामुळे आपल्या शरीराला कोणते फायदे मिळतात

जवस हे आपल्या आरोग्यासाठी सुपरफुड म्हणून ओळखले जाते. लहान जवसाच्या बियांमध्ये भरपूर पौष्टिकता असते आणि ते अनेक आरोग्य फायदे देतात. या बियांमध्ये ओमेगा- फॅटी ॲसिड, प्रथिने, अँटिऑक्सिडंट्स, जीवनसत्त्वे आणि खनिजे असतात, जे शरीराला असंख्य फायदे देतात. आहारात जवसाचे सेवन केल्याने कोणते रोग कमी होऊ शकतात आणि त्यात कोणते पोषक घटक आहेत हे जाणून घेऊया.

**जवस खाण्याचे आरोग्यवर्धक फायदे**

जवसात ओमेगा३ आणि अँटिऑक्सिडंट्समुळे त्वचा चमकदार राहते व केस मजबूत होतात. विशेषतः महिलांसाठी जवस उपयुक्त आहे. यात लिग्नॅन्स असतात जे हार्मोनल संतुलन राखण्यास मदत करतात. जवसमधील पोषक घटक शरीराची प्रतिकारशक्ती मजबूत करतात.

जवसामध्ये ओमेगा३ फॅटी ॲसिड मोठ्या प्रमाणात असते. त्यामुळे कोलेस्टेरॉल कमी होण्यास मदत होते आणि हृदयविकाराचा धोका कमी होतो. तसेच जवसामध्ये मुबलक प्रमाणात फायबर असते. त्यामुळे बद्धकोष्ठता कमी होते, पोट साफ राहते आणि पचनसंस्था निरोगी राहते.

जवस खापल्ल्याने पोट जास्त वेळ भरल्यासारखे वाटते. त्यामुळे वारंवार भूक लागत नाही आणि वजन नियंत्रणात राहते. जवसमधील विद्रव्य फायबर रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवण्यास मदत करते.

**जवस कसे खावे? :** भाजून पूड करून दररोज १२ चमचे घ्यावे. चपातीच्या पिठात किंवा भाजी/सलाडमध्ये मिसळून खाता येते. कोमट पाण्यासोबतही घेऊ शकता.

# हप्ते थकल्याच्या नावाखाली दाम्पत्याला दमदाटी केल्याप्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल

**यवत, ता. २४ :** तुमचे लोनचे हप्ते थकले आहेत, गाडी ओढून नेतो अशी धमकी देत अज्ञात इसमांनी चारचाकी वाहनाला दुचाकी अडवून दाम्पत्याला दमदाटी करीत शिवीगाळ केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. या प्रकरणी दोन अनोळखी इसमांविरुद्ध यवत पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला. पुणे-सोलापूर महामार्गावरील पाटस टोलनाका परिसरात रविवारी (ता. २२) सायंकाळी सव्वाचार वाजण्याच्या सुमारास हि घटना घडली.




याप्रकरणी अक्षय भाऊसाहेब सानप (वय -३०, रा. फातीमानगर चौक, पुणे) यांनी यवत पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार यवत पोलिसांनी अज्ञात दोन इसमांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी अक्षय सानप हे पत्नी ऋषाली सानप यांच्यासह २१ फेब्रुवारी रोजी देवदर्शनासाठी अक्कलकोट येथे गेले होते. २२ फेब्रुवारी रोजी दुपारी देवदर्शन करून ते सोलापूरपुणे मार्गे परतत असताना सायंकाळी सुमारे सव्वाचार वाजता पाटस टोल नाका येथून पुढे २०० मीटर अंतरावर दोन अनोळखी इसमांनी मोटारसायकल आडवी लावून त्यांची गाडी अडवली.

तुमच्या गाडीचे हप्ते थकले आहेत, वाहन जप्त करायचे आहे, असे सांगत संबंधित इसमांनी गाडी थांबवण्यास भाग पाडले. मात्र फिर्यादी यांनी हप्ते थकले नसल्याचे स्पष्ट केले. त्यानंतरही संशयितांनी उध्दट भाषेत बोलत गाडी बाजूला घेण्याचा दबाव टाकला. पत्नी सोबत असल्याने व परिस्थिति संशयास्पद वाटल्याने सानप यांनी तेथून निघण्याचा निर्णय घेतला. धक्कादायक बाब म्हणजे संबंधित दोघांनी मोटारसायकलवरून थेट यवतपर्यंत पाठलाग केला.

दरम्यान, सायंकाळी सुमारे पाऊणे पाच वाजता बँक ऑफ बडोदा यवत शाखा समोर पुन्हा गाडी अडवून तुझी गाडी ओढून नेऊ, यवतमधून जाऊनच दाखव अशी धमकी देत शिवीगाळ केली. फिर्यादी अक्षय सानप यांनी प्रसंगावधान राखत संशयितांच्या काळ्या रंगाच्या स्प्लेंडर मोटारसायकलचा (क्रमांक चक ४२ इठ ०७) फोटो काढला आणि तत्काळ डायल ११२ वर संपर्क साधून पोलिसांची मदत मागितली. पोलिस येत असल्याचे लक्षात येताच दोन्ही इसम घटनास्थळावरून पसार झाले. याप्रकरणी यवत पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १२६(२), ३५२, ३५१(२)(३) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस हवालदार खोमणे करीत आहेत.

## दोन अल्पवयीन मुलींवर अत्याचार करणाऱ्या आरोपीला अटक

**पंढरपूर, ता. २४ :** सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर तालुक्यात दोन अल्पवयीन मुलींवर अत्याचार झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. विशेष म्हणजे या प्रकरणातील संशयित आरोपी देखील अल्पवयीन असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. घटनेमुळे परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात असून कठोर कारवाईची मागणी होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित मुली गावातील एका किराणा दुकानात घरगुती वस्तू खरेदी करण्यासाठी गेल्या होत्या. त्यावेळी दुकानात असलेल्या अल्पवयीन मुलाने संधी साधून त्यांच्यावर अत्याचार केल्याचा आरोप आहे. ही घटना दुकानाच्या परिसरातच घडल्याची माहिती मिळत आहे. घडलेला प्रकार मुलींनी आपल्या पालकांना सांगितल्यानंतर प्रकरण उघडकीस आले. त्यानंतर पीडित मुलीच्या आईने पोलिसांकडे तक्रार दाखल केली.

# सेक्स रॅकेटमध्ये अभिनेत्रीचा सहभाग; दोन महिलांची सुटका

**ठाणे, ता. २४ :** अभिनय क्षेत्रात करिअर करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या एका तरुणीने पैशांच्या मोहापोटी चुकीचा मार्ग निवडल्याची धक्कादायक घटना ठाणे शहरात उघडकीस आली आहे. महिलांना पैशांचे आमिष दाखवून त्यांच्याकडून देहविक्रय करवून घेतल्याप्रकरणी ठाणे पोलिसांनी २६ वर्षीय अभिनेत्रीला अटक केली आहे. या कारवाईदरम्यान पोलिसांनी दोन महिलांची सुटका केली असून त्यापैकी एक महिला हिंदी मालिका आणि वेबसिरीजमध्ये काम करणारी अभिनेत्री असल्याची माहिती समोर आली आहे.



ठाणे पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाला एका महिलेबाबत गोपनीय माहिती मिळाली होती. संबंधित महिला जास्त पैसे मिळवून देण्याचे आमिष दाखवून महिलांना देहविक्रयासाठी प्रवृत्त करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीची खातरजमा करण्यासाठी पोलिसांनी बनावट ग्राहकाच्या माध्यमातून त्या महिलेशी संपर्क साधला. संपर्कादरम्यान आरोपी महिलेने हिंदी वेबसिरीज आणि टीव्ही मालिकांमध्ये काम करणाऱ्या मुली उपलब्ध करून देऊ शकते, असे सांगत काही महिलांचे फोटोही पाठवले.

**आरोपीला रंगेहात पकडलं**

व्यवहार निश्चित झाल्यानंतर आरोपी महिला दोन महिलांना घेऊन वागळे इस्टेट परिसरातील एका हॉटेलमध्ये आली. यावेळी आधीच सापळा रचून बसलेल्या पोलिसांनी छापा टाकून आरोपीला रंगेहात अटक केली. या कारवाईत पोलिसांनी ४० आणि ४८ वर्षे वयोगटातील दोन महिलांची सुटका केली. तपासादरम्यान आरोपी महिला स्वतः हिंदी वेबसिरीजमध्ये काम करत असल्याचे समोर आले आहे. मात्र, अभिनय क्षेत्रात नियमित काम मिळत नसल्याने आणि आर्थिक अडचणींमुळे तिने हा मार्ग स्वीकारल्याची कबुली दिली आहे. कुटुंबाचा खर्च भागवण्यासाठी आणि स्वतःच्या गरजा पूर्ण करण्यासाठी ती या रॅकेटमध्ये सहभागी झाली होती.

या प्रकरणी वागळे इस्टेट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून न्यायालयाने आरोपी महिलेला २६ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या रॅकेटमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास पोलीस करत आहेत.

## गर्भवतीच्या पोटात लाथ मारल्याने बाळ दगावले

**भिवंडी, ता. २४ :** भिवंडी शहरातील शांतिनगर परिसरात किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून अत्यंत धक्कादायक घटना घडली आहे. एका कोंबडीवरून सुरू झालेल्या भांडणात तिघींनी केलेल्या मारहाणीत गर्भवती महिलेचा गर्भपात झाल्याची घटना समोर आली आहे. ही घटना १७ फेब्रुवारी रोजी रात्री सुमारे ८ वाजण्याच्या सुमारास गायत्रीनगर भागात घडली. या घटनेमुळे परिसरात भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित महिला आणि जोहरा बानो तसेच तिच्या दोन सहकाऱ्यांमध्ये कोंबडीच्या कारणावरून वाद झाला. सुरुवातीला हा वाद फक्त शाब्दिक स्वरूपात झाला, मात्र काही वेळातच तो वाढत गेला आणि त्याचे रूपांतर मारहाणीत झाले. यावेळी आरोपी महिलांनी पीडित महिलेवर हल्ला करत तिच्या पोटात लाथ मारल्याचा आरोप आहे. या मारहाणीनंतर संबंधित महिलेला तीव्र पोटदुखी सुरू झाली आणि काही वेळातच तिला रक्तस्त्राव होऊ लागला. तिची प्रकृती बिघडल्याने तिला तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले.

रुग्णालयात डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर उपचार सुरू केले, मात्र उपचारादरम्यान महिलेचा गर्भपात झाल्याचे स्पष्ट झाले. या घटनेमुळे पीडित महिला आणि तिच्या कुटुंबीयांना मोठा धक्का बसला आहे. त्यानंतर पीडित महिलेने २१ फेब्रुवारी रोजी शांतिनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी जोहरा बानो आणि तिच्या दोन सहकाऱ्यांविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत असून आरोपी महिलांची चौकशी सुरू आहे.



## काँग्रेसचे प्रवक्ते हनुमंत पवार यांच्यावर हल्ला

**पुणे, ता. २४ :** पुण्यातील एका वृत्तवाहिनीच्या कार्यालयाबाहेर काँग्रेसचे प्रवक्ते हनुमंत पवार यांच्यावर झालेल्या हल्ल्याने राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा तापले आहे. डिबेट शोसाठी गेलेल्या पवार यांनी चर्चेदरम्यान भाजपच्या काही नेत्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांबाबत केलेल्या वक्तव्यांवर टीका केल्याचे सांगितले जाते. शो संपल्यानंतर बाहेर पडताच काही हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांनी त्यांना घेरल्याचा आरोप आहे. पवार यांच्या म्हणण्यानुसार, तुषार दामगुडे यांनी शिवीगाळ करत कमरेला पिस्तूल असल्याचे दाखवून धमकी दिली आणि त्यानंतर चार-पाच जणांनी मारहाण केली. विचारांची लढाई विचारांनीच लढली पाहिजे, हिंसेने नव्हे, अशी प्रतिक्रिया पवार यांनी दिली.

या घटनेचा सीसीटीव्ही व्हिडिओ सोशलमीडियावरशेअरकरतकाँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे कठोर कारवाईची मागणी केली. ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनीही हा हल्ला लोकशाही मूल्यांवरचा आघात असल्याचे म्हटले आहे. त्यांच्या मते, मतभेद असले तरी दहशत आणि हिंसेच्या माध्यमातून विरोधी आवाज दाबण्याचा प्रयत्न अस्वीकार्य आहे.

दरम्यान, पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल करून काही आरोपींना ताब्यात घेतल्याची माहिती दिली आहे. परंतु या घटनेचे राजकीय पडसाद उमटण्याची चिन्हे स्पष्ट आहेत. महाराष्ट्रात आधीच तापलेल्या राजकीय वातावरणात अशा प्रकारच्या घटना अभिव्यक्ती स्वातंत्र्य, राजकीय संवाद आणि कायदा-सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण करतात. निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर नेत्यांच्या वक्तव्यांवरून वाद होणे नवीन नाही; मात्र त्याचे रूपांतर प्रत्यक्ष हिंसेत होणे ही चिंतेची बाब आहे.



## पुण्यात सायकल स्पर्धेसाठी केलेली कामे निकृष्ट दर्जाची? पुन्हा रस्ते ‘जैसे थे’

**पुणे, ता. २४ :** आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेच्या नावाखाली पुणे महानगरपालिकेने दाखवलेल्या तत्परतेनंतर आता रस्त्यांवरील चेंबर समपातळीत आणण्यासाठी अवघ्या दोन महिन्यांपूर्वी विनानिविदा खर्च केलेले १५ कोटी रुपये अक्षरशः खड्ड्यात गेले आहेत. आंतरराष्ट्रीय दर्जाची कामे असल्याचा दावा करणाऱ्या प्रशासनाचा फुगा अवघ्या महिन्यातच फुटला असून, शहरातील प्रमुख रस्त्यांवरील चेंबर आता तुडुंब भरली आहेत. २४ जानेवारी रोजी पुण्यात आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. जागतिक स्तरावरील खेळाडू पुण्याच्या रस्त्यांवरून धावणार असल्याने, ७५ किलोमीटरचे रस्ते चकचकीत करण्याचे लक्ष्य पालिकेने ठेवले होते. यासाठी १४५ कोटींचे बजेट मंजूर झाले. मात्र, घाईघाईत रस्त्यांवरील चेंबरची उंची वाढवण्यासाठी पथ विभागाने 'विशेष अधिकार' कडून १२ ते १५ कोटींची कामे कोणत्याही निविदेविना स्थायी समितीकडून मंजूर करून घेतली.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रत्येक चेंबर उचलण्यासाठी पालिकेने तब्बल साडेबारा हजार रुपये मोजले आहेत. इतकी मोठी रक्कम खर्च करूनही वापरलेले साहित्य निकृष्ट असल्याचे आता दिसून येत आहे. निविदा प्रक्रिया न राबवता कामे दिल्याने ठेकेदारांच्या कामाच्या गुणवत्तेवर आता प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

## पुणे–संभाजीनगर प्रवास आता फक्त तीन तासांत शक्य

**पुणे, ता. २४ :** पुणे आणि मराठवाड्याला जोडणाऱ्या महत्त्वाकांक्षी ‘पुणे-छत्रपती संभाजीनगर’ द्रुतगती प्रकल्पामुळे अनेकांना दिलासा मिळणार आहे. गेल्या पाच वर्षांपासून कागदावरच असलेला हा प्रकल्प आता प्रत्यक्ष सुरु होत आहे. केंद्र आणि राज्य सरकारने या महामार्गासाठी तब्बल २२००कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केली असून, कामाला वेग देण्याचे आदेश दिले आहेत.

दोन टप्प्यांत होणार काम खराडी ते शिरूर (एलिव्हेटेड मार्ग): पुण्यातील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी खराडी जंक्शन ते शिरूर बायपासपर्यंत ५३.४ किमीचा सहा पदरी उड्डाणपूल बांधला जाईल.

शिरूर ते छत्रपती संभाजीनगर: १९२.५ किमीचा प्रवास पूर्णपणे नवीन ‘ग्रीनफिल्ड’ मार्गाने होईल.



यामुळे सध्याच्या वळणावळणाच्या रस्त्यांवरून सुटका होणार आहे.

सध्या पुणे ते संभाजीनगर प्रवासासाठी ५ ते ६ तास लागतात. हा नवा महामार्ग पूर्ण झाल्यावर हे अंतर अवघ्या ३तासांत कापले जाईल. शिरूर, नगर आणि संभाजीनगर या औद्योगिक पट्ट्यातील मालवाहतूक सुलभ होईल. वाळूज, शेंद्रा, जालना आणि बीड या भागांतील उद्योगांना यामुळे थेट पश्चिम महाराष्ट्राची बाजारपेठ जोडली जाणार आहे.

## वाहतूक कोंडी फोडण्यासाठी पोलिसांचे हायटेक पाऊल

**पुणे, ता. २४ :** पुणे शहरातील वाढती वाहतूक कोंडी आणि अपघातांची संख्या लक्षात घेऊन वाहतूक पोलिसांनी आता आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर सुरू केला आहे. वाहतुकीचे नियोजन अधिक प्रभावी करण्यासाठी ट्रॅफिक्युअर नावाची नवीन सॉफ्टवेअर प्रणाली सुरू करण्यात आली आहे. या प्रणालीच्या मदतीने शहरातील वाहतुकीची स्थिती पोलिसांना रिअल टाइममध्ये समजणार असून, कोंडी कमी करण्यासाठी तात्काळ उपाययोजना करणे शक्य होणार आहे.



या सॉफ्टवेअरला गुगल मॅप्सची जोड देण्यात आली आहे. त्यामुळे शहरातील कोणत्या रस्त्यावर वाहतूक संथ आहे, कुठे जास्त कोंडी आहे किंवा कुठे अपघात होण्याची शक्यता आहे, याची अचूक माहिती पोलिसांना मिळणार आहे. यामुळे पोलिसांना योग्य ठिकाणी कर्मचारी तैनात करता येतील आणि वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी तातडीने निर्णय घेता येतील.

वाहतूक नियंत्रण अधिक प्रभावी करण्यासाठी संपूर्ण शहराची ५५० लहान विभागांमध्ये विभागणी करण्यात आली आहे. जानेवारी आणि फेब्रुवारी महिन्यात या प्रणालीची ४५ दिवस चाचणी घेण्यात आली. या काळात शहरातील मुख्य रस्त्यांवर वाहनांचा सरासरी वेग सुमारे २६.८ किलोमीटर प्रति तास असल्याचे आढळून आले. या चाचणीचे सकारात्मक परिणाम दिसून आल्याने आता ही प्रणाली पूर्णपणे लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पुणे पोलिसांच्या या उपक्रमामुळे वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे. तसेच आपत्कालीन परिस्थितीत पर्यायी मार्ग सुचवणेही सोपे होणार आहे. या प्रणालीमुळे वाहतूक नियंत्रणात आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर होणार असून, पुणेकरांना भविष्यात वाहतुकीतून दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# ‘आरओडीटीईपी’ योजनेतील दरात ५० टक्के कपात; कृषी निर्यात क्षेत्रावर होणार परिणाम


**मुंबई, ता. २४ :** कमी बाजारभाव आणि वाढत्या उत्पादन खर्चामुळे आधीच आर्थिक अडचणीत सापडलेल्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी आणखी एक धक्का बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे. केंद्र सरकारच्या वाणिज्य व उद्योग मंत्रालयाने निर्यात प्रोत्साहनाशी संबंधित निर्यात केलेल्या उत्पादनांवरील शुल्क आणि करांमध्ये सूट(आरओडीटीईपी) या योजनेतील दरात तब्बल ५० टक्के कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे कृषी निर्यात क्षेत्रावर, विशेषतः कांदा प्रक्रिया उद्योगावर गंभीर परिणाम होऊ शकतो, अशी भीती शेतकरी संघटनांनी व्यक्त केली आहे.

**आरओडीटीईपी योजना काय?**

आरओडीटीईपी योजना निर्यातदारांना उत्पादन प्रक्रियेदरम्यान भरावे लागणारे अप्रत्यक्ष कर व विविध शुल्क परत देण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आली होती. या योजनेमुळे भारतीय उत्पादने आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत किमतीच्या स्पर्धेत टिकून राहण्यास मदत होत होती. कृषी आणि कृषी-प्रक्रिया क्षेत्रासाठी ही योजना महत्त्वपूर्ण मानली जात होती.

**दरकपातीचे संभाव्य परिणाम**

तज्ज्ञांच्या मते, आरओडीटीईपी दर कमी झाल्याने निर्यातदारांचा उत्पादन व वाहतूक खर्च वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे निर्यात



नफ्यात घट होईल आणि कांदा प्रक्रिया उद्योगावर आर्थिक ताण वाढेल. निर्यात घटल्यास देशांतर्गत बाजारात कांद्याचा पुरवठा वाढून दर घसरण्याची शक्यता आहे, ज्याचा थेट परिणाम शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर होऊ शकतो. याशिवाय आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत भारताची स्पर्धात्मकता कमी होण्याचा धोका देखील व्यक्त केला जात आहे.

**प्रमुख मागण्या**

शेतकरी संघटनेने केंद्र सरकारकडे आरओडीटीईपी दर कपातीचा निर्णय तात्काळ मागे घेण्याची मागणी केली आहे. तसेच कृषी व कृषी-प्रक्रिया उत्पादनांसाठी स्वतंत्र आणि अधिक दर निश्चित करावेत, कांदा प्रक्रिया उद्योगासाठी किमान चार टक्के RODTEP दर लागू करावा आणि निर्यात प्रोत्साहन धोरणात दीर्घकालीन स्थैर्य आणावे, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत.

दर कपातीचा निर्णय कायम राहिल्यास कांदा निर्यात आणि शेतकरी उत्पन्नावर दीर्घकालीन परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.